RESEARCH NEBULA
AN INDEXED, REFERRED & PEER REVIEWED JOURNAL

J-Gate
INDEXED

ISSN 2277-8071

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

## TWO - DAY 46th ANNUAL CONFERENCE OF

## VIDHARBHA ARTHASHASTRA PARISHAD

4th & 5th February, 2023

*Organized by*

## LOKMANYA TILAK MAHAVIDYALAYA, WANI DIST. YAWATMAL

Guest Editor
**DR. PRASAD KHANZODE**
Principal
Lokmanya Tilak Mahavidyalaya,
Wani, Dist. Yavatmal

Executive Editor
**DR. KARMSING RAJPUT**
Head, Dept. of Economics
Lokmanya Tilak Mahavidyalaya,
Wani, Dist. Yavatmal

Chief Editor
**DR. G. P. KHANDARE**
Y.C. Arts and Science Mahavidyalaya,
Mangrulpir, Dist. Washim

Special Issue Published on 4th February, 2023
www.ycjournal.net

Scholarsteer — Scholarly Information
DataCite
JIF

Scanned with OKEN Scanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071


| | | | |
|---|---|---|---|
| 24. | प्रा.डॉ.एम.आर. दातीर<br>सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,<br>जगदंब महाविद्यालय अचलपूरशहर जिल्हा अमरावती | कोविड-१९चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 143 |
| 25. | डॉ. राजू घनश्याम श्रीरामे<br>उपप्राचार्य तथा पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम त. नरखेड जि. नागपूर | भारतिय अर्थव्यवस्था: कोरोना महामारी - विरोधाभास आणि परिणाम | 148 |
| 26. | डॉ.डी.एस.गुर्जर<br>सहा.प्राध्यापक,<br>जयविकास महाविद्यालय, शिरपूर(होरे), ता.देवळी, जि.वर्धा | कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 160 |
| 27. | डॉ. राजेश उल्हासराव बुंरगे<br>संचालक,राष्ट्रीय सेवा योजना, सं गा.बा. अमरावती विद्यापीठ,<br>सहयोगी प्राध्यापाक अर्थशास्त्र विभाग<br>श्री शिवाजी कला व वाणीज्य महाविद्यालय,अमरावती | कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 165 |
| 28. | सागर शंकर बरशेट्टीवार<br>संशोधक विद्यार्थी<br>प्रा. डॉ. करमसिंग रा. राजपूत<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि. यवतमाळ | Covid 19 आणि भारतीय शिक्षणव्यवस्था | 170 |
| 29. | प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन<br>प्रोफेसर तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>एस.पी.एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय ,चिखली, जिल्हा बुलढाणा-443201<br>प्रा.डॉ.राजेंद्र कुमार रामराव गव्हाळे<br>प्रोफेसर तथा पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>जी.एस.कॉलेज, खामगाव, जि.बुलढाणा-444312 | कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 173 |
| 30. | कु. उषा लक्ष्मणराव घोडे<br>संशोधक, एम.ए. (अर्थशास्त्र ) एम.एड.<br>प्रा. डॉ. गजानन बन्सीलाल बनचरे<br>मार्गदर्शक, एम.ए.एम.फिल.(अर्थशास्त्र) पी.एचडी. | कोरोना महामारीचा पश्चिम विदर्भातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेल्या प्रभावाचे अध्ययन | 178 |
| 31. | प्रा. डॉ. सुभाष रा. गुर्जर<br>अर्थशास्त्र विभागप्रमुख<br>कला वाणिज्य महाविदयालय,वरवट बकाल जि. बुलडाणा | कोविड-19 चे विविध क्षेत्रावरील परिणाम | 181 |
| 32. | प्रा.डॉ.विठ्ठल निळकंठ ठावरी<br>सहा.प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख<br>कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी जि.चंद्रपूर | कोवीड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 185 |
| 33. | प्रा.डॉ.शरयु मनीष पोतनूरवार<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>सरदार पटेल महाविद्यालय ,चंद्रपूर | कोविड १९ चा भारतीय अर्थव्यवस्थेतील केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांवरील परिणाम (विशेष संदर्भ : चंद्रपूर जिल्हा) | 190 |




Scanned with OKEN Scanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

*Two - Day 46TH Annual Conference of* Vidharbha Arthashastra Parishad
@ Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani Dist. Yawatmal
4th & 5th February, 2023

प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन
प्रोफेसर तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
एस.पी.एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय ,
चिखली, जिल्हा बुलढाणा-443201

प्रा.डॉ.राजेंद्र कुमार रामराव गव्हाळे
प्रोफेसर तथा पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
जी.एस.कॉलेज, खामगाव,
जि.बुलढाणा-444312

## कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

*भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी विभागाचा वाटा अतिशय महत्वाचा असून, भारतीय अर्थव्यवस्थेतील एकूण अन्नधान्य उत्पादन 2019-20 या वर्षात त्याच्या मागील वर्षापेक्षा 6.74 मेट्रिक टन उत्पादन अधिक आहे .जे गेल्या पाच वर्षाच्या तुलनेत अधिक आहे .प्रचंड आकारमान व उच्च वृत्ती दर असणाऱ्या लोकसंख्येला गुणवत्ता पूर्ण व सुदृढ जीवनमानासाठी आवश्यक भूमिका साकारण्यासाठी भारतातील कृषी व औद्योगिक क्षेत्राची वाटचाल अभ्यासणे महत्वाचे ठरते.तसेच "भारतीय अर्थव्यवस्थेवरील कोविड-19 चे झालेले परिणाम "या अनुषंगाने विचारात घ्यावयाचे आहेत .सदर पार्श्वभूमीवर या दृष्टीने या संशोधन पर निबंधात "कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम "याचा थोडक्यात आढावा घेण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे .*

*Key words - कोरोना /कोविड-19, भारतीय अर्थव्यवस्था, कृषी व औद्योगिक क्षेत्र*

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा वाटा लोकसंख्येच्या अनुषंगाने 52 टक्के लोकसंख्या यावर अवलंबून आहे. जी.डी.पी.त शेती क्षेत्राचा हिस्सा 14.6% असून, देशातील 48% लोकसंख्या गैर कृषी व्यवसायात कार्यरत आहे. त्यांचे एकूण अंतर्गत उत्पादनातील योगदान 83 टक्के आहे .कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून, खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे .या कण्याला कोविड-19 च्या लॉक डाऊन ने पूर्णतः मोडकळीस आणले .भारतीय अर्थव्यवस्थेची कृषी क्षेत्रातील वाटचाल यामुळे पूर्णपणे थांबलेली दिसून आली. कृषी उत्पादनातील वाढ फक्त 5.3% नोंदवली गेली. कोविड 19च्या लॉकडाऊन ने शेतकऱ्यांची आर्थिक दैन्यावस्था झालेली पहावयास मिळते .या "कोविड-19चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम "या संशोधन पर लेखनात यावर संशोधकाने थोडक्यात प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**कोविड-19 च्या लॉकडाऊन मुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील परिणामांच्या अभ्यासाचे महत्व :**

"कोविड-19 च्या लॉकडाऊन मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम" अभ्यासणे महत्वाचे ठरते .या परिणामांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे .त्यासाठी या अभ्यासाचे महत्व जाणून घेऊन संशोधन पर लेख तयार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

1) कोविड-19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांचा अभ्यास करणे .
2) कोविड-19 परिस्थितीमुळे भारतातील विविध क्षेत्रातील असणाऱ्या संधीचे विश्लेषण करणे.

3) कोविड-19 च्या लॉकडाऊन मुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील होणाऱ्या परिणामांच्या सोडवणुकीसाठी उपाययोजना सुचवणे.

अभ्यासाची गृहितके :

1 भारतात सतत कोविड-19 चा प्रभाव कमी होत राहिल .

2 भारतातील विविध क्षेत्रातील विकास वाढीचा वेग कोविड-19 च्या लॉकडाऊनमुळे वेग मंदावला .

3 कोविड-19 च्या लॉकडाऊनमुळे भारतातील विविध क्षेत्रांवर त्याचे विपरीत परिणाम झालेत

संशोधन पद्धती :

सदरचे संशोधन पर लेखाचा अभ्यास पूर्णपणे दुय्यम साधन सामग्रीवर आधारित असून त्यासाठी विविध पुस्तके, संदर्भ ग्रंथ, वार्षिकांक ,मासिके, विविध अहवाल ,साप्ताहिके ,दैनंदिन वृत्तपत्रे इत्यादींचा संदर्भ म्हणून वापर करण्यात आलेला आहे. त्यातूनच वरील दुय्यम साधनांचे आधारावरच सदर संशोधन पर शोधनिबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

कोरोनाची पार्श्वभूमी :

कोविड-19 हा विषाणू सर्वात घातक गणला जाणारा विषाणू आहे . आजतागायत जगात या विषाणूंच्या लागण झालेल्या ची संख्या 25 कोटी पेक्षा ही अधिक असून, या रोगाची लागण जगातील जवळपास 40 टक्के लोकांना झालेली दिसून येते.विविध आकड्यांच्या आधारे यातील मृत्यु झालेल्यांची संख्या 2.5 कोटींच्या ही वर आहे. भारतात कोविड-19 या विषाणूचे रूग्ण 90 लाखांपेक्षा ही जास्त आहे, तर मृत्यु पावलेल्यांची संख्या 2 लाख पेक्षा ही अधिक आहे. 31 डिसेंबर 2019 रोजी चीन मधील' वूहान ' या प्रांतात या रोगाच्या संसर्गाची पहिली वार्ता बाहेर आली व 3 महिन्यांच्या अल्प कालावधीतच हा विषाणू जगातील 114 देशांमध्ये दोन लाखांपेक्षाही अधिक रुग्णांपर्यंत पोहोचला. पुढील 90 दिवसात यातील रुग्णांची संख्या 13 पट वाढली .30 जानेवारी 2020 ला भारतात कोविड-19 चा पहिला रुग्ण 'केरळ'मध्ये आढळला पुढील 49 दिवसातच हा विषाणू भारतातील 22 राज्यात पोहोचला. महाराष्ट्रात या विषाणूची लागण झालेल्यांची संख्या जवळपास या कालखंडात 1.5 लाखांच्या वर आढळते . तर या कालावधीत जवळपास 1 .5लाख रुग्णांना या रोगाची लागन होऊन ,मृत्यू पावलेल्यांची संख्या 4 हजाराच्या घरात होती .एकट्या मुंबईत या कालावधीत 70 हजारांच्या च्या वर रुग्णांना या विषाणूची लागण होऊन ,मृत्यू पावलेल्यांची संख्या एकट्या मुंबई त 2000 च्या घरात होती.

भारतातील इतर रोगांचा इतिहास :

भारतात 1918 मध्ये 1.5 कोटी भारतीयांना फ्ल्यू च्यासाथीने मृत्यू आला . तर 2020 मध्ये कोविड-19 च्या विषाणूमुळे एवढे लोक मरणार नाहीत अशी खत्री होती. संक्रामक रोगांवर भारतीयांनी विजय मिळवला असून, भारताचा जन्मदर दर दर हजारी 40 वरून 20 वर म्हणजेच निम्म्यावर आला आहे .तर भारतीयांचे सरासरी वय 28वर्षे आहे म्हणून भारताला "तरुणांचा देश "म्हणतात.

कोविड-19 चे लॉकडाऊन मुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवरील परिणाम_.

कोविड-19 मुळे विविध व्यवसायांमध्ये कोरोना मंदीचा फटका/चटका अनेक उद्योगांना बसला .परिणामी पर्यायी वस्तूंची विक्री करूनही मंदीमुळे फटका बसलेल्यांची तीव्रता अधिक दिसून आली .वस्तूच्या मागणीतही कमालीची घसरण पहावयास मिळाली.

कोरोनाच्या कालखंडामध्ये भारतातील एप्रिल 2020 ते फेब्रुवारी 2021 या कालखंडात जवळपास 10113 कंपन्या बंद झाल्याची सुतवाच सरकारकडून करण्यात आले .यात दिल्लीतील 2394 कंपन्या,महाराष्ट्रातील 1279 कंपन्या,उत्तर प्रदेश, तामिळनाडू राज्यातील अनेक बंद पडलेल्या कंपन्यांची संख्या लक्षणीय होती. कोवीड 19चा प्रसार भारतात होऊनही टाळेबंदीचे निर्बंध लादल्यामुळे देशातील कृषीक्षेत्र वगळता सेवा क्षेत्रातील हालचाल ऑक्टोबर 2020 नंतरच्याही कालावधीत काही प्रमाणात वाढलेली

आढळली .मात्र निर्मिती क्षेत्रातून उत्पादन प्रक्रियेला पाहिजे त्या प्रमाणात पातळी गाठता आलेली दिसून येत नाही.

कोविड 19 कालखंडामध्ये भारतातील जवळपास 1.5 कोटी पर्यंत रुग्ण बाधित झाले .यात जवळपास दोन लाखांपेक्षा अधिक मृत्यू झाल्याचे दिसून येते. कोविड-19 च्या संख्येत 25 टक्के रुग्ण व 34 टक्के मृत्यू झाल्याचे या विभागातआढळुन आले. ही बाब चिंताजनकरीत्या आढळली आहे.

पश्चिम विदर्भातही रुग्णांची संख्या कोवीड 19बाधित रुग्णांची संख्या 80 टक्क्यांनी वाढल्याचे आढळते. यात सरासरी दररोज पश्चिम विदर्भात तीन रुग्णांचा कोविड 19चा मृत्यू होण्याची बाब आढळून आली .ही स्थिती भयावह होती. कोविड-19 च्या कोरोना निर्बंधामुळे अनेक उद्योगांना जसा फटका बसला तशाच पद्धतीने अनेक व्यावसायिकांनाही या बाबींचा फटका बसला .गर्दी टाळण्यासाठी शासकीय निर्बंध मुळे यात्रा, पर्यटन स्थळे,उद्योग,धंदे बंद करण्यात आली .यामुळे पर्यटकांची संख्या रोडावली. पर्यटन बंदी केली गेली .तसेच निर्बंध व बंधने आणल्यामुळे अनेक पर्यटक तसेच व्यावसायिक हे आपल्या रोजी रोटीला मुकले.

सहाजिकच ओघाओघानेच कोविड-19 या विषाणूचा फटका भारतीय शेती उद्योगालाही बसल्याचे दिसून आले .आंबा, द्राक्ष, डाळिंब इत्यादी फळांच्या निर्यातीवर त्याचा विपरीत परिणाम होऊन 50 टक्के हून ही अधिक भाजीपाल्याची निर्यात वाहतुकी अभावी घटली. भारत देशातून एकूण निर्यातीपैकी 65 टक्के फळे व 55 टक्के भाजीपाला निर्यात करणाऱ्या महाराष्ट्रावर गंभीर आर्थिक संकट उभे राहिले .द्राक्षांची निर्यात होऊ शकली नाही. केळी व गहू यांचीही निर्यात घटली. 2018-19 च्या आर्थिक वर्षात 2 कोटी 30 लाख 84 हजार 690 मेट्रिक टन शेती माल फळ, फुलं, प्रक्रिया केलेल्या शेतीमालाच्या निर्यातीतून देशाला 1लाख 30 हजार 387 कोटी रुपये परकीय चलन मिळाले .मात्र कोविड-19 च्या लॉक डाऊन च्या महामारीने शेतकऱ्यांच्या यां मन सुब्यांवर पाणी फिरण्याची चिन्हे दिसून आले .भारतातील शेती उत्पादनावर विपरीत परिणाम झालेत .2019-20 च्या कृषी क्षेत्रातील एकूण मूल्य वाढ 4थ्या तिमाहीत वाढून 5.09 टक्के पोहोचला. जो मागील वर्षात समान तिमाहीत 1.6 टक्के होता. कोविड-19 च्या लॉक डाऊन चा फटका मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना बसला .शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना सरकारच्या बेफिकिरी वृत्तीमुळे विमानातून फिरणाऱ्यांनी हा माल आयात केला .मात्र त्याची किंमत शेतकऱ्यांना मोजावी लागली .भारतीय अर्थव्यवस्थेला जगविणारा, देशाचा आर्थिक डोलारा पेलणारा ,भारतीय शेतकरी हतबल झाला .शेतमालाला भाव नाही .सीमा बंदीमुळे शेतमाल, जीवनावश्यक वस्तू ,भाजीपाला, दूध ,फळे, उत्पादकाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, शेतकऱ्यांच्या हिताचे होते. महाराष्ट्रात रोज 1 कोटी 17 लाख लिटर दूध संकलन होते. त्यापासून ताक ,दही ,लस्सी, पनीर ,आम्रखंड ,श्रीखंड इत्यादींची मागणी बंद झाली .परिणामी हॉटेल व्यवसाय मंदावला . कामगारांविना दूध पावडर कंपन्या बंद राहिल्या. दूध संकलन वाहतूक बंदीमुळे घटले .कोंबडी पालन व्यवसायही कोविड-19 चा प्रभावात आला .निशिगंध ,झेंडू ,हळद ,अद्रक, फुलशेती, जरबेरा, कार्नेशन यांची विक्री व निर्यात बंदीने अब्जावधी रुपयांचा माल वाया गेला. बटाटा,कोबी, फ्लॉवर ,टोमॅटो, वांगी ,दोडका, शेवगा, भेंडी सडलीत .बाजार व वाहतूक बंद झाल्याने भाजीपाल्यावर, फळबागांवर काही शेतकऱ्यांनां नांगर फिरवावा लागला .ऊस ,अंजीर, स्ट्रॉबेरी, केळी, पपई ,पेरू, द्राक्ष, चिकू, कलिंगड ,टरबूज उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले .हरभरा, तूर या डाळ पिकांची अवस्था तीच झाली .द्राक्ष शेतीचे जवळपास 10 हजार कोटींचे नुकसान झाले. विदर्भातील संत्री ,मराठवाड्यातील मोसंबी झाडावर सडली .यांची छोटे ज्युस उद्योग बंद पडल्याने त्यांनाही उठाव मिळाला नाही .कांदा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान करून रडवून गेला. कापूस उत्पादक शेतकरीही संकटात सापडला. अमेरिका

,बांगलादेश , व्हिएतनाम हे कापसाचे मोठे आयातदार देश कोरोनाच्या धाका मुळे कापसाचे भाव गडबडले .काजू पिकांची ही दलालांनी कोरोनामुळे घटत्या भावाने खरेदी करून शेतकऱ्यांची लूट केली. आंबा निर्यात अभावी संकटात सापडला .लॉक डाऊन चा काळ संपेपर्यंत निर्यातीला गती येईल असे वाटत नाही. सरकारची अग्नी परीक्षा घेणारा व सत्वपरीक्षा घेणारा हा काळ होता. सरकार फाटलेल्या आभाळाला ठीगळ लावू शकत नव्हते .मात्र व्यवस्थेचे भरण पोषण करणाऱ्या शेतकऱ्यांचे पीक शेतात डोलल्याशिवाय कुणाचेही पोट भरत नाही ,हे ही सत्य सर्वांनाच कळावयास हवे आहे.

कोविड 19 चे इतरही परिणाम :

- 15 लाख कोटी रुपयांचें उत्पादन गमावले
- 14 कोटी लोकांना रोजगार गम मावा लागला
- बेरोजगारीचे प्रमाण 27 टक्के पर्यंत वाढले.
- बेरोजगारी व वेतन दरात वाढ झाली
- उत्पादन वाढीचा वेग घटत गेला.
- 2020-2021 चा वृधीचा दर शून्य पेक्षा खाली आला .
- लाखो कामगार व मजूर घर वापसी स्थलांतरात अडकले.अशा मजुरांची संख्या 5 कोटींच्या घरात होती .स्थलांतरितांमुळे मजुरांचे हाल वाढले
- उपासमारीची वेळ आली.
- उत्पन्नात घट झाली .
- पुरवठा साखळ्या तुटल्या.
- कर्मचाऱ्यांची पगार तुंबले /घटले
- बँकांची थकबाकी वाढली.
- उत्पादित माल गोदामात पडून होता.

अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने:

1. औदद्योगिक व कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढविणे वर भर देणे.
2. कृषी व औद्योगिक क्षेत्रातील रोजगार वाढीवर भर देणे.
3. कृषी व औद्यगिकीकरण क्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ करणे.
4. सिंचन सुविधांमध्ये वाढ करणे.
5. सर्व क्षेत्रातील उत्पादन प्रक्रिया उद्योगांवर व व्यवसायांवर भर देणे.
6. विमा योजनेत वाढ करणे व सेवा देणे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील संधी :

1. विविध कृषी व औद्योगिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे .
2. अल्प कालावधीत अधिक उत्पादन देणाऱ्या औद्यगिक व कृषी संशोधनांवर भर देणे.
3. व्यापारी व नगदी उत्पादन वाढीवर कृषी व औद्यगिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात भर देणे.

भारतातील विविध क्षेत्रातील परिणामांवरील उपाय योजना:

1. आंबा, द्राक्षे, ऊस , केळी तसेच इतर शेती उत्पादनांचे कृषी प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात उभारले जावेत तसेच इतर औद्योगिक उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावेत.
2. नगदी पिकांच्या उत्पादनांवर तसेच औद्योगिक उत्पादनांवर मोठ्या प्रमाणात भर द्यावा.
3. नाशवंत मालाची उत्पादने कमी करून टिकाऊ उत्पादित माल उत्पादन करण्यावर भर द्यावा.
4. विविध क्षेत्रातील तसेच कृषी व औद्योगिक क्षेत्रातील संशोधनांवर मोठ्या प्रमाणात भर द्यावा.

**निष्कर्ष**

_भारत हा "तरुणांचा देश" असून ,भारतात कृषी व औद्योगिक उत्पादनांवर मोठ्या प्रमाणात भर दिला जातो. भारताकडे पुरेशा प्रमाणात श्रम व साधन संपत्ती आहे .परकीय चलनाचा साठाही बऱ्या प्रमाणात आहे

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

.काम करणारी इच्छा शक्ती, श्रमशक्ती असून ,उत्पादनाचे, बेरोजगारीचे, स्थलांतराचे, दारिद्र्याचे ,यामुळे लोकशाही स्वातंत्र्याचे नुकसान होत आहे. औषध शोध, लस शोध, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करणे. त्यावर लक्ष देऊन निर्णायक असे धोरण यांच्या साहयाने कोरोनाच्या कोविड-19 च्या व्यवस्थापनाने युद्ध करावे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कायदा हा लोकशाहीला पर्याय असू नये. कोविड-19 च्या संकटामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत काहीसा बदल करून विविध क्षेत्रातील हितसंबंधांना केंद्रस्थानी ठेवून शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी व कामगारांच्या कल्याणासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजनांचा समावेश नियोजनात करण्यात यावा व नियोजन पूर्ण करून विविध कृषी व औद्योगिक विभागांच्या महत्वकांक्षी योजनांची यशस्वी व प्रभावी अंमलबजावणी व्हावी, एवढीच काय ती अपेक्षा.

## संदर्भसूची

1. महाजन डॉ.दिलीप पांडूरंग(2020) कोविड-19 लॉक डाऊन चा भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्रावरील परिणाम . बीड: विद्यावार्ता. हर्षवर्धन पब्लिकेशन प्रा. लि. पब्लिशड (पान नंबर 143 ते 146).
2. महाजन. डॉ दिलीप पांडुरंग. (2020) भारतीय शेती क्षेत्रावर कोरोना 19 च्या लॉकडाऊन चा परिणाम. **औरंगाबाद** : पैनगंगा प्रकाशन,( पेज नंबर 77_ 82).
3. दैनिक वृत्तपत्रे _लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, सकाळ ,नवभारत टाइम्स ,दिव्य मराठी ,लोकमत, जनसत्ता ,लोकशाही वार्ता, जनशक्ती ,जागरण ,सामना, तरुण भारत ,पुण्यनगरी, नवप्रहार, मातृभूमी.



Scanned with OKEN Scanner

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

४६ वे वार्षिक अधिवेशन २०२३

दिनांक ४ व ५ फेब्रुवारी २०२३

: आयोजक :

शिक्षण प्रसारक मंडळ, वणी द्वारा संचालित

## लोकमान्य टिळक महाविद्यालय

वणी, जि. यवतमाळ (नॅक द्वारा 'ब' श्रेणी प्राप्त)

११-

# ॥ प्रमाणपत्र ॥

श्री / श्रीमती / प्रा. / डॉ. दिलीप पी. महाजन

महाविद्यालयाचे नांव - एस.पी.एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली (बुलढाणा)

यांनी दोन दिवसीय वार्षिक अधिवेशनामध्ये प्रतिनिधी म्हणुन सहभाग घेतला. तसेच त्यांनी "कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम" या विषयावर शोध निबंध सादर केला. करिता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डॉ. निवृत्ती पिस्तुलकर | डॉ. संजय कोठारी | डॉ. श्रीराम कावळे | डॉ. करमसिंग राजपूत | डॉ. प्रसाद खानझोडे |
| कार्याध्यक्ष | सचिव | अध्यक्ष | स्थानिक सचिव | प्राचार्य |
| विदर्भ अर्थशास्त्र परिषद | विदर्भ अर्थशास्त्र परिषद | विदर्भ अर्थशास्त्र परिषद | विदर्भ अर्थशास्त्र परिषद | लो.टि.महाविद्यालय, वणी |

Scanned with OKEN Scanner